MHBI120003782017

## दि. मु. नं. ७८/२०१७ मधील नि.क्र. ७७ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी, प्रतिवादी यांनी खरेदीखत क्र. ०८/२००६, १४१५/२००६ व खरेदीखत क्र. १६७५/२००९ , १४१५/२००६ व खरेदीखत क्र. १६७५/२००९ न्यायालयात दाखल करावे अशा आदेशासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जदार/वादी यांचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने जाहीर ठरावासाठी, खरेदीखत रदद होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्यामध्ये झालेले खरेदीखत क्र. ०८/२००६, १४१५/२००६ व खरेदीखत क्र. १६७५/२००९ याबाबत वादींनी प्रस्तुत दाव्यात दाद मागीतली असल्याने सदरील मुळ दस्त या दाव्यात न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी सदरील मुळ दस्त त्यांच्या ताब्यात असताना सुध्दा न्यायालयात दाखल केलेले नाहीत. सबब, प्रतिवादी यांनी खरेदीखत क्र. ०८/२००६, १४१५/२००६ व खरेदीखत क्र. १६७५/२००९ चु मुळ दस्त अभिलेखावर दाखल करण्याबाबत प्रतिवादींना आदेशीत करण्यात यावे.

०३. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी सदर अर्जास आक्षेप घेतला आहे व अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. २ यांच्याविरुध्द प्रकरण एकतर्फा

चालवण्याबाबतचा आदेश दिनांक ०१.०७.२०२२ रोजी पारीत करण्यात आलेला आहे.

०४. अर्ज त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्र याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे प्रकरण पुराव्यासाठी प्रलंबित आहे. वादीने प्रस्तुतचा दावा खरेदीखत क्र. ०८/२००६, १४१५/२००६ व खरेदीखत क्र. १६७५/२००९ हे दस्त रदद होवून मिळण्यासाठी व जाहीर ठरावासाठी दाखल केलेला आहे. सदर दस्त रदद करुन मागावयाचे असल्यामुळे वादीने मुळ दस्त अभिलेखावर दाखल करण्याबबात आदेश होण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदरील मुळ दस्त त्यांच्या ताब्यात नसल्याचे कथन केलेले नाही. प्रतिवादी क्र. २ यांच्याविरुध्द प्रकरण एकतर्फा सुरु आहे. ज्याअर्थी प्रतिवादी क्र. २ यांच्या हक्कात झालेला खरेदीखत क्र. १४१५/२००६ वादीने रदद करुन मागीतला आहे, त्याअर्थी सदर दस्त अभिलेखावर दाखल करणे गरजेचे आहे, ही बाब प्रतिवादी क्र. २ यांना माहीत असणे अपेक्षीत आहे. असे असताना प्रतिवादी क्र. २ यांनी सदर मुळ दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. अशा परिस्थीतीत वादीस प्रतिवादी क्र. २ यांच्याकडे असणा–या मुळ दस्ताचा दय्यम पुरावा देण्याची मुभा उपलब्ध राहणार असल्यामुळे प्रतिवादी क्र. २ यास मुळ खरेदीखत क्र. १४१५/२००६ अभिलेखावर दाखल करण्याबाबतचा आदेश करणे गरजेचे नाही.

०५. प्रतिवादी क्र. १ व ३ यांच्या हक्कात झालेले दस्त संबंधीत प्रतिवादी यांनी

नाकारलेले नाहीत. सबब, प्रतिवादी क्र. १ व ३ यांना त्यांच्या लाभात झालेले खरेदीखत क्र. ०८/२००६ व खरेदीखत क्र. १६७५/२००९ अभिलेखावर दाखल करण्याचे आदेश पारीत करणे योग्य होणार आहे. वरील चर्चेच्या अनुषंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी खरेदीखत क्र. ०८/२००६ व खरेदीखत क्र. १६७५/२००९ चे मुळ दस्त अभिलेखावर दाखल करावेत असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

२. दस्त क्र. १४१५/२००६ या दस्ताचा दुय्यम पुरावा देण्याची वादींना मुभा देवून प्रतिवादी क्र. २ यांच्याबाबत वादींचा निशाणी क्र. ७७ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by RAJENDRA VASANT KADAM
Date: 2023.06.15 17:27:34 +0530

स्थळ–धारुर (रा.व.कदम )
दिनांक १५.०६.२०२३ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
धारुर

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड–३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १५.०६.२०२३ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १५.०६.२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १५.०६.२०२३ |

सही/–
(**ए.एस.गंगणे**)
(लघुलेखक ग्रेड–३)
दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर